## शंकरराव कुलकर्णी - वारणानगरचा किमयागार

शंकरराव म्हणजे आमचे संगीतसर. मी स्वतः खरे तर फार वर्षे शंकररावांच्या तालमीत नव्हतो. बहुतेक ७ वीत माझा श्री वारणा बालवाद्यवृंदात प्रवेश झाला व मला वाटते मी १० वीला असतानाच शंकररावांनी वारणानगरला रामराम ठोकला. पण त्या ३-४ वर्षांतही शंकरराव माझ्या आयुष्यावर व हृदयावर कायमचा ठसा उमटवून गेले. त्यांच्याच कृपेने आज मी चार लोक जमले आणि एकमेकांच्या कलागुणांचे प्रदर्शन सुरू झाले की माझे violin वादन पुढे करून माझी अब्रू व्यवस्थित सांभाळू शकतो. शंकररावांच्या कृपेने माझ्यात संगीताची आवड निर्माण झाली – जिच्या साह्याने माझे जीवन अपरिमित समृद्ध तर झालेच, शिवाय मला जाईल तिथे मित्र मिळवणे सोपे झाले, एकटेपणाचे दुःखही कधी जाणवले नाही. एव्हढेच नव्हे माझी जीवनसाथी मिळवून देण्यात तिचा मोठा सहभाग होता! आज माझ्या मुलांबरोबर पित्यापेक्षा माझे संगीताचे कनेक्शन अधिक मजबूत आहे.

शंकररावांची आणि माझी पहिली भेट वाद्यवृंदाच्या बाहेरच झाली. मी ६ वीत असतानाची गोष्ट. त्यावर्षी कोल्हापुरात राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मशताब्दीचा मोठा सोहळा होणार होता व त्यात शाहूमहाराजांचे विविध क्षेत्रातील कर्तृत्व दाखवणारे फिरते देखावे बनवले जाणार होते. संगीत क्षेत्रातही शाहू महाराजांचे कार्य मोठे होते. त्यांच्या पाठिंब्यामुळे अनेक उदयोन्मुख कलावंत – केशवराव भोसले, अल्लादियाखान इ. – प्रसिद्धीस आले असे म्हणतात. तर अशा कलावंतांचा फिरता देखावा बनवण्याचे काम शंकररावांकडे सोपवले गेले होते. या कलाकारांची भूमिका लहान मुलेच करणार होती. शंकरराव अल्लादिया खानासाठी योग्य मुलाच्या शोधात होते. मला आठवते खेळाच्या वेळी - म्हणजे ५ ते ६ - ते शाळेत मैदानावर आले व आम्हा मुलांना जवळ बोलावण्यात आले. मीही धावत

गेलो. मला पाहाताच शंकरराव म्हणाले, “हा मुलगा खान म्हणून चांगला आहे !”

पुढचे फारसे आठवत नाही. माझ्याबरोबर बाकी मुले कोण होती हे पण आठवत नाही. मुग्धा नाईक बहुधा केशवराव भोसले झाली होती. पण एव्हढे आठवते की मी अल्लादियाखानाचा वेष घालून, दाढीमिशा वगैरे लावून कोल्हापुरात त्या देखाव्यात उभा राहून फिरलो !

वर लिहिल्याप्रमाणे मी वाद्यवृंदात ७ वीत असताना दाखल झालो व शंकररावांच्या तालमीत ३-४ वर्षेच होतो. माझ्या तुलनेत वारणेतले माझे इतर सवंगडी (यातल्या “सवंग” शब्दामुळे ही मला शिवीच वाटते!!) शंकररावांच्या हाताखाली बरीच वर्षे होते. सामान्यतः मूल ४-५ वर्षांचे झाले की ते संगीतक्लासमध्ये रूजू व्हायचे. या “बालचमूंचा” वर्ग सकाळी असायचा. मग ते मूल ५ वीत गेले की त्याला मुख्य क्लासमध्ये बढती मिळायची. हा मुख्य क्लास संध्याकाळी असायचा. आमची शाळा श्री वारणा विद्यालय ४:४० ला संपायची आणि मग ५ ते ६ या वेळेत शाळेतच “सक्तीचा खेळाचा तास” असायचा. पण संगीतक्लासच्या मुलांना हा तास माफ असायचा आणि आम्ही ५ वाजता संगीतक्लासमध्ये हजर व्हायचो. क्लास संपण्याची वेळ पूर्णपणे शंकररावांच्या मर्जीवर असे. ७:३०/८ च्या आधी घरी पोहोचलेले मला आठवत नाही! पण ऐन बालपणाच्या जोषात असल्यामुळे असेल किंवा शंकररावांच्या संगीताची मोहिनी असेल, मला थकून गेल्याचे, कधी कंटाळल्याचे आठवत नाही.

मी जेव्हा join झालो तेव्हा आमचा हा संगीतक्लास एखाद्या ऑर्केस्ट्रासारखा दिसायचा. म्हणजे असे multi-level stage बनवले होते व त्यावर वाद्ये छान दिसतील अशी मांडलेली होती. अगदी खाली म्हणजे श्रोत्यांच्या अगदी समोर ४ पेटीवाले, त्यांच्या दोहों बाजूला दोन जलतरंग व मधोमध संतूर अशी सुरूवात व्हायची. मग मागच्या पायरीवर सतारी,

सरोद, मॅंडोलिन्स, तारशहनाई इत्यादी, आणि त्यांच्याही मागे व्हायलिनवाले व सगळयात वरच्या पायरीवर ३ गिटार वाजवणाऱ्या मुली. सगळी तालवाद्ये एका बाजूला जवळजवळ असायची. त्यांच्यातच बासरीवाले लपून बसायचे. आणि मग उरलेली वाद्ये हवाई गिटार, बॉंगो, बुलबुल, चेलो, सारंगी, दिलरूबा, इलेक्ट्रिक ऑर्गन, अकॉर्डियन इतरत्र विखुरलेली असायची. अगदी मागच्या भिंतीवर कार्यक्रमांच्या वेळी एक मोठा मखमली पडदा लावायचे ज्याच्यावर सुंदर अक्षरांत “श्री वारणा बालवाद्यवृंद” लिहिलेले होते. समोर श्रोत्यांना बसायला किमान ४-५ तरी बाकांच्या रांगा असल्याचे मला आठवते.

क्लासमध्ये कोणी कुठले वाद्य वाजवायचे हे ते मूल, त्याचे आईवडील आणि शेवटी शंकरराव असे सगळे ठरवायचे. मी स्वतः सुरूवातीला बासरी शिकायची असे मनात धरून होतो. पण शंकररावांनी तू व्हायलिन वाजव असा निर्णय दिला व मी अगदी शेवटून दुसऱ्या रांगेत बसलेल्या व्हायलिनच्या ताफ्यात जाऊन बसलो. काही मुले एकाहून जास्त वाद्ये वाजवत. उदाहरणार्थ माझीच बहीण अंजू पेटी, संतूर, ऑर्गन अशी तीनचार वाद्ये वाजवायची. मी मात्र एकदा व्हायलिन घेऊन फतकल मारून बसलो की दुसऱ्या वाद्यांच्या वाटेला जात नव्हतो. पण तरीही माझ्या आवडीमुळे मी थोडीफार पेटी व बासरी शिकलो. घरी ही वाद्ये असल्याने शिकणे व प्रॅक्टीस करत राहाणे सोपे झाले. नवीन वाद्ये आणण्यासाठी शंकरराव अधुनमधून पुण्या-मुंबईला चक्कर मारत. त्यांनी माझ्या आईवडलांच्या विनंतीस मान देऊन माझ्यासाठी एक व्हायलिन आणून दिले. ते अजून माझ्याकडे आहे आणि त्याच्यावर वारणेचे सुप्रसिद्ध पेंटर शहाजी जाधव यांच्या अक्षरात माझे नावही आहे.

वारणा साखर कारखाना, त्याचे पदाधिकारी, चेअरमन तात्यासाहेब व खुद्द शंकरराव या सर्वांतले समीकरण, परस्परांतले राजकारण हे मला तेव्हाही काहीच माहित नव्हते आणि आजही नाही. पण असे वाटते की शंकरराव

स्वतः संगीतक्लासचे बऱ्याच अंशी मुखत्यार (in charge) होते. तिथला सर्व कारभार, क्लासमध्ये कुठली वाद्ये घ्यायची, त्यांची रचना कशी करायची हे सर्व तेच ठरवायचे. त्यांच्यातला कलावंत, विशेषतः फिल्मी कलावंत (कारण पूर्वायुष्यात ते मराठी सिनेमात संगीत दिग्दर्शक होते) इतर बाबीतूनही, presentation मधून स्पष्ट दिसायचा.

मुळात शंकरराव वारणानगरला आलेच कसे? मी ऐकलेली गोष्ट अशी आहेः वारणेत येण्यापूर्वी शंकरराव मराठी सिनेसृष्टीत संगीत दिग्दर्शक होते. आज इंटरनेटवर शोधले तर त्यांनी संगीत दिलेली बरीच गाणी सापडतात. कालांतराने काही कारणाने शंकरराव त्या दुनियेला विटले. मग आता काय करायचे! त्यावेळी वर्तमानपत्रात वारणानगरमध्ये सह्याद्री कुक्कुटपालन संस्थेत नोकऱ्या असल्याची जाहिरात होती. ती त्यांनी पाहिली आणि झटका आल्याप्रमाणे अर्ज केला व वारणेत मुलाखतीसाठी हजर झाले. पण तोवर त्या सर्व जागा भरल्या होत्या. तात्यासाहेबांचे श्रेय असे की त्यांनी शंकररावांना तसेच परत न पाठवता विचारले, “तुम्ही अजून काय करू शकता?” शंकरराव उत्तरले, “मी संगीत शिकवू शकतो”. “मग आमच्या प्राथमिक शाळेत संगीत शिक्षक म्हणून काम कराल?” शंकरराव अर्थातच होकारले.

झाले! अशा प्रकारे शंकररावांची वारणेत रूजवात झाली. पण या निव्वळ शालेय मास्तरकीचे रूपांतर स्वतंत्र वाद्यवृंद बनवण्यात कसे झाले ही कथा मात्र मला ठाऊक नाही.

वाद्यवृंदाच्या “संगीत मेनू” मध्ये काय होते असे विचाराल तर काय नव्हते असा प्रश्न पडतो! रागदारी, सिनेमातली गाणी, लोकगीते, लावणी, नाट्यसंगीत, सोलो तबला, पाश्चात्त्य संगीत, असे अनेक प्रकार शंकररावांनी आमच्याकडून बसवून घेतले होते. रागदारीत सुद्धा रागमालिका, जुगलबंदी, पूर्ण एकाच रागावर आधारित धून असे अनेक

प्रकार होते. भक्तिगीत या प्रकारात तर त्यांनी चक्क वारकरी पद्धतीने आम्हाला नाचत अभंग म्हणायला शिकवले होते. प्रत्यक्ष कार्यक्रमात वारकऱ्यांचा पोशाख घालून हा प्रकार पेश केला जायचा.

एव्हढी कल्पकता, एव्हढी विविधता, आणि ते पन्नास-एक (बाल)कलाकारांकरवी यशस्वीरित्या प्रकट करवून घेण्याचे कौशल्य पाहून असे वाटते की शंकरराव सिनेमात असताना केवळ संगीत दिग्दर्शक नसून सिनेदिग्दर्शकच असावेत.

आज विचार करता खरंच अतीव आश्चर्य वाटते की वारणानगरसारख्या आडवाटेवरच्या छोट्या गावात असा, सर्व प्रकारच्या – जुन्या व नवीन – वाद्यांनी नटलेला, अत्याधुनिक पद्धतीने (दृक व श्राव्य दोन्ही प्रकारे) मांडणी केलेला, वाद्यवृंद होता! तोही छोट्या मुलांचा – ज्यांना स्वतःचा शेंबूड कदाचित पुसता येत असेल, पण आपण खरेतर नक्की काय शिकतोय, संगीत खरंच कशाशी खातात, हे समोरचे लोक एव्हढे डोक्यावर का घेताहेत हे उमजत होते असे मला वाटत नाही. “वारणेचा वाद्यवृंद एक चमत्कार” अशा घोषणा ऐकून छातीत गर्वाची भावना फुगून यायची. पण ते तेव्हढेच. किमान मला तरी या सर्व प्रकाराच्या “महानतेची” जाणीव खूप नंतर झाली.

शंकरराव अतिशय कडक होते. जलतरंग वाजवायला ज्या काड्या वापरल्या जायच्या त्या अशा छान वेताच्या छड्याच होत्या. शंकररावांना एखाद्याचा वैयक्तिक समाचार घ्यावासा वाटला की ते ती एक छडी घेऊन स्टेजवर आक्रमण करायचे. मग दिल्लीवर खिल्जीची स्वारी झाल्यावर दिल्लीकरांचे जसे धाबे दणाणून जात असेल तसे आमचे व्हायचे! आता नक्की कुणावर ही छडी येऊन कोसळणार यावर तर्क-कुतर्क सुरू व्हायचे.

पण शंकरराव क्रूर, खुनशी वगैरे अजिबात नव्हते. दहशत बसेल इतपतच ते छडी फिरवायचे. ‘‘बेसूर’’ वाजवण्यावर त्यांचा सर्वाधिक कटाक्ष होता. वाद्यवृंदाचे बरेच कार्यक्रम व्हायचे. कधी आमच्याच क्लासमध्ये – पुलंसारखे नामांकित पाहुणे वारणानगरला भेट देत असतील तर – किंवा परगावी मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणी. पण कुठलाही कार्यक्रम संपला की श्रोत्यांनी टाळ्या वाजवून व समाप्तीच्या भाषणांतून कौतुकाचा कितीही पाऊस पाडला तरी, आम्ही मुले मात्र मनांत चळचळा कापत असायचो. कारण सगळे श्रोते गेले की शंकरराव कार्यक्रमाचा आढावा घ्यायचे व ज्यांनी बेसूर वाजवले असेल त्यांना ‘‘वैयक्तिक’’ भेट देऊन छडीचा प्रसाद देऊन जायचे. व्हायलिनवाले बेसूर वाजवण्यात अग्रेसर. त्यामुळे आमच्या वरच्या पायरीपर्यंत शंकरराव दम लागला तरी यायचेच! सुदैवाने मला स्वतःला छड्या खाण्याचा योग फारसा आल्याचे आठवत नाही. एकतर मी अगदी हळू वाजवायचो. आणि खाली बसलेले शंकरराव आणि मी यांच्यात बरीच इतर वाद्ये असल्याने त्यांच्यामागे लपून राहण्याचे कसब मला आत्मसात झाले होते!

‘‘पुरूषोत्तम, तुझा ध कुठे आहे!’’ असे त्यांनी एकदा दरडावलेले मला आठवतेय! हे म्हणताना सुदैवाने त्यांच्या हातात छडी नव्हती. का कुणास ठाऊक पण मला ते पुरूषोत्तम अशी हाक मारत. ‘‘पुरूष’’ म्हणण्याइतका मी मोठाही नव्हतो आणि ‘‘उत्तम’’ तर नक्कीच नव्हतो! अर्थात त्यांची चूक दुरूस्त करण्याचे धारिष्ट्य दाखवावे एव्हढा ‘‘अभय’’ देखील मी नव्हतो!

‘‘बेसूर’’ वाजवणे याखेरीज ‘‘चावटपणा’’ हादेखील शंकररावांना अजिबात नापसंत होता. म्हणजे काय तर उगाच फिदीफिदी हसणे, आपापसात गप्पा मारणे इत्यादी. पण त्यामुळे आम्ही सर्व मुले पूर्ण कार्यक्रमभर उगाचच चेहरे लांब करून बसत असू. तशी गरज नव्हती, थोडा खेळकरपणा चालला असता असे आता वाटते. अर्थात आमचे काही मित्र -- प्रदीप,

प्रमोद, शरद वगैरे – थोडे जास्तच “खेळकर” होते. त्यामुळे त्यांना कधीकधी “चावटपणा” बद्दल छडीचा मार मिळायचा. एखाद दिवशी छडीचा प्रसाद घेण्यासाठी अनेकजण qualify होत असतील अशा दिवशी सर्वांना खाली बोलवून रांगेत उभे केले जाई व मग प्रत्येकाला त्याच्या गुन्ह्यानुसार छडीचा प्रसाद मिळे.

एक मोठे आश्चर्य म्हणजे शंकरराव एका कानाने बहिरे होते. तरीही त्यांना बेसूर स्वर एव्हढ्या पन्नास वाद्यांतून ऐकू यायचा आणि तो नक्की कुठल्या वाद्यातून आला हेही कळायचे हे मोठे नवल होते! मला आठवते कधीकधी ते दोन्ही हात कानांवर कप ठेवल्यासारखे ठेवून कान झाकायचे आणि ऐकायचे. त्यातून त्यांना काहीतरी जास्त समजायचे की काय कोणास ठाऊक! आमची बोटे वाद्यांवर कुठे फिरताहेत हे पाहूनही त्यांना अंदाज येत असेल.

स्वतः शंकरराव त्यांची पेटी घेऊन आमच्या समोर खुर्चीवर बसायचे. त्यांचे पेटीवादन अव्वल दर्जाचे होते. आता आपण गोविंदराव टेंबे अथवा पुलं यांच्या पेटीवादनाचे कौतुक ऐकतो. पण शंकररावांची पेटी त्यांच्या तुलनेची नक्कीच होती असे मी म्हणेन. शंकररावांच्या शिकवण्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते कुठलेही गाणे – मग ते सिनेमातले असो किंवा नाट्यगीत असो – हुबेहूब आहे तसे कधीच शिकवत नसत. कुठे तरी स्वतःची कल्पकता टाकून एखादी नवीन तान, हरकत, असे काही तरी करायचे. नाट्यगीत किंवा शास्त्रीय रागांवर आधारित काही शिकवताना तर त्यांची सृजनशक्ती धरण फुटल्यासारखी वाहायला लागायची आणि त्यांना तानांमागून ताना सुचायच्या. आम्हाला मुख्य ओळ बसवून दिली की आम्ही ते आळवणे सुरू करायचो आणि मग शंकरराव क्लासमध्ये किंवा बाहेर जाऊन फेऱ्या मारायचे, व अचानक काही सुचले की पेटीवर बसून वाजवून पाहायचे. मार्तंडगुरूजींच्या (जे सर्व तालवाद्ये – तबला, ढोलक, इ. – शिकवायचे) साह्याने ते तालात बसतेय असे वाटले की ते आम्हाला

थांबवायचे आणि ती नवीन तान/ओळ वाजवून दाखवायचे. “एकदा ऐकून वाजवेल त्याला १०० रूपये बक्षीस!” असे मिष्कील चेहऱ्याने आम्हाला म्हणायचे. एकदा जरी नाही तरी दोन-तीनदा ऐकून वाजवू शकणारे अतिरथी/महारथी आमच्यांत होते. त्यात शुभांगी शिंदे, वासंती कुलकर्णी ह्या मला प्रकर्षाने आठवतात. पण एकदाही कुणा महाभागाने हे १०० रूपये जिंकल्याचे आठवत नाही.

पण मुद्दा असा, की संगीत शिकण्याचा हा सर्व प्रकार अनोखा, अभिनव व रोमांचक होता. क्लासमध्ये वेळ कसा गेला हे कळायचे नाही (असे मी वर म्हटले आहे) त्यात नवल ते काय! नोटेशन वाचून न शिकता कान वापरून संगीत शिकणे हे भारतीय संगीताचे मुख्य अंग आहे, नव्हे ती एक देणगीच आहे. शंकररावांनी त्याचे तंत्र आम्हाला शिकवले. आज मला मुले/वादक नोटेशनची पाने शोधताना दिसतात तेव्हा त्यांची दया येते.

शंकरराव संगीतकलेत अव्वल तर होतेच. पण अधुनमधुन ते आम्हाला गोष्टी सांगत, मौलिक उपदेशही करत. त्यांची अशी काही वाक्ये अजून आठवतात. “स्वतःला शहाणा समजणे ही गाढवपणाची सुरूवात आहे” हे असे एक त्यांचे आवडते वाक्य.

शंकररावांचे वैयक्तिक जीवन मला फारसे कधीच कळले नाही किंवा मी कधी समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. लहानपणी आपण इतरांच्या बाबतीत किती उदासीन असतो याची आता जाणीव होते आणि शरम वाटते. शंकरराव नेहमी पांढरे शुभ्र कपडे – एक नेहरू सदरा व लेंगा – अशा पेहरावात असत. ते अगदी चकचकीत शुभ्र आणि कडक इस्त्री केलेले असत. मला वाटते एकदा फॉरेनच्या ट्रिपच्या वेळी त्यांनी आपला पेहराव बदलला तेव्हढाच. एरवी सदोदित सदरा आणि लेंगाच! केव्हातरी ते रस्त्यात चालत असताना दिसत. आपल्याच विचारात गुंग असलेले, कदाचित नवीन ताना बसवण्याच्या प्रयत्नात किंवा आता कुठले गाणे

बसवायचे या विचारात. नेहमी एकटेच. त्यांना कधीच कुणाशी गप्पा मारताना, कुणाबरोबर हिंडताना मी पाहिले नाही. आमचे तालवाद्ये शिकवणारे मार्तंड गुरूजी तसे एकटेच असावेत. केव्हातरी हे दोघे एकत्र दिसायचे, पण तेही क्वचित. माझ्या ऐकीव माहितीनुसार शंकरराव एकटेच, एका खोलीत राहात व रोज थोडा वरणभात करून खात. त्यांची पत्नी व मुलगा कोल्हापुरात राहात अशी वदंता होती. बहुतेक त्यांचा घटस्फोट झाला होता किंवा ते विभक्त झाले होते. शंकररावांसाठी केवळ वाद्यवृंद व आम्ही विद्यार्थी एव्हढेच त्यांचे विश्व होते.

मी स्वतः शंकररावांकडून प्रत्यक्ष धडे घेतल्याचे आठवत नाही. माझ्यासारखे नवखे व्हायलिनवाले क्लासच्या दाराबाहेर बसत आणि कर्कश्श आवाजात तारा घासत राहात. लहानपणी आपल्या संवेदना कमकुवत असण्याचा किती फायदा असतो. आता मला कुणी नवखा व्हायलिनवाला अजिबात ऐकवत नाही! असो. तर मी क्लासच्या दाराबाहेर बसून काही दिवस काढले व मग मला आत बसण्याची परवानगी मिळाली. श्रीधर आणि अतुल मला सीनियर होते त्यामुळे त्यांच्याकडूनच पुढचे शिक्षण झाले. एकदा व्हायलिनचे बेसिक तंत्र कळल्यावर मात्र इतरांसारखे शंकरराव पेटी वाजवून दाखवत ते ऐकून-ऐकून बसवत गेलो. मी अर्थात इतरांच्या तुलनेत लिंबू-टिंबूच राहिलो. मात्र मला संगीताचे व आमच्या क्लासचे तुफान वेड लागले. साधारणतः दहावी झाली की मुले क्लासमधून निवृत्त होत. पण मी मात्र ११ वी – १२ वीतही क्लासमध्ये येत राहिलो. कधी नुसते समोर बसून ऐकायला, कधी मार्तंडगुरूजींकडून तबला शिकायला. त्या सुमारास शंकरराव वारणानगर सोडून गेले होते. नंतर इंजिनियरींगसाठी परगावी गेलो तरी वारणेत आलो की क्लासची चक्कर व्हायचीच.

एखादा मोठा कार्यक्रम असला – बाहेरगावी किंवा क्लासमध्येही – की शंकरराव आणि मार्तंडगुरूजी आधी खूप वेळ येऊन सगळी वाद्ये लावायचे

– म्हणजे tune करायचे. पन्नास वाद्ये अशी tune करायची हे केव्हढे जिकीरीचे काम आहे. अर्थात त्यात मदत करणेही कठीण! कारण त्यासाठी आपला कान तयार हवा. कदाचित आमच्यातले महारथी तशी मदत करत असतीलही, आता मला आठवत नाही.

वारणानगर हे आदर्श गाव असले आणि तिथे अनेक अभूतपूर्व आणि अभिनव प्रयोग झाले असले तरी शेवटी माणसांचे राजकारण, त्यांचे हेवेदावे तिथेही होतेच. अशाच एका राजकारणात शंकररावांचा बळी पडला. नक्की काय झाले मला माहित नाही. पण शाळेचे प्राचार्य महाबळेश्वरवाला आणि शंकरराव यांच्यात फारसे सख्य नव्हते. मी दहावीत असताना प्रकरण चिघळले आणि एके दिवशी अचानक समजले की शंकरराव वारणानगर सोडून जात आहेत. मला धक्काच बसला. ज्या व्यक्तीने स्वर्गीय संगीताची देणगी या छोट्या गावाला दिली, त्या गावाचे नाव जगभर प्रसिद्ध केले, जागतिक पातळीच्या बाल-ऑलिंपिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करून सुवर्णपदक जिंकून दिले, त्याच व्यक्तीला या गावाने हुसकून लावावे?! वारणानगरची ख्याती अनेक कारणांसाठी असेल. मला स्वत:साठी वारणानगर हा एक चमत्कारच वाटतो – कारण इथल्या वास्तव्यात माझ्या आयुष्याला जे वळण मिळाले, जे अनुभव मिळाले, जे शिकायला मिळाले, ते अन्यत्र कुठेच शक्य नव्हते असे अजूनही वाटते. एव्हढा मी अनेक ठिकाणी हिंडलो पण वारणानगरसारखा अनोखा आणि यशस्वी प्रयोग कुठेच पाहाण्यात आला नाही. असे सर्व असले तरी, सत्य हे आहे की “वारणा बालवाद्यवृंद” हे वारणानगरचे खरे भूषण होते, खरे मर्म होते, खरे हृदयस्थान होते. बाकी सर्व गोष्टी इतर लोकही कदाचित करू शकले असते. पण असा वाद्यवृंद उभा करणे ही एक दैवी किमया होती. वारणेत एव्हढे हुशार, कर्तबगार, अनुभवी, बुजुर्ग लोक होते, पण ते एकत्र येऊन, चर्चा करून सामोपचाराने शंकररावांना थांबवू शकले नाहीत हा वारणानगरचा सर्वात मोठा पराभव आहे असे मी मानतो.

वारणानगर सोडल्यावर शंकरराव अकलूजला गेले व तिथे त्यांनी वारणेसारखाच लहान मुलांचा शिवपार्वती वाद्यवृंद उभा केला. पण त्यात त्यांचा कितपत जीव होता याबद्दल मी साशंक आहे. पहिला जॉब, पहिले प्रेम या गोष्टी जशा स्पेशल असतात तसा अगदी जीव ओतून उभा केलेला वारणा वाद्यवृंद नक्कीच शंकररावांसाठी स्पेशल असणार.


आज Internet वर search केले तर शंकररावांच्या काही गोष्टी सापडतात. त्यांनी सिनेमात असताना रचलेली गाणी वगैरे. वानगीदाखल काही उदाहरणे खाली देतो:

https://www.cinestaan.com/people/shankar-rao-kulkarni-73225
https://gaana.com/artist/shankarrao-kulkarni
https://www.aathavanitli-gani.com/Sangeetkar/ShankarRao_Kulkarni

अगदी अलीकडेच एकदा आकाशवाणीवर शंकररावांची – अर्थातच खूप पूर्वी रेकॉर्ड केलेली – मुलाखतही बऱ्याच लोकांना ऐकायला मिळाली. पण शंकररावांचे खरे स्थान आम्हा विद्यार्थ्यांच्या हृदयात आहे. त्यांनी आम्हाला संगीताची अमोल देणगी दिली, एक अगदी वेगळ्या प्रकारचे बालपण अनुभवायची संधी दिली, हे आम्ही कदापि विसरू शकत नाही. माझे शंकररावांना अगदी मनापासून विनम्र अभिवादन.

*लेखक: अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com)*
*२ - २ - २०२२*

## Photos:





## The orchestra and its members:



### ARTISTS & INSTRUMENTS

1) Master Nilesh Nandkumar Naik, age 14, Electric Guitar and Electric Organ. 2) Nagesh Anant Deshmukh, age 15, Electric Bulbul. 3) Shridhar Nishikant Paramane, age 12, Violin. 4) Pramod Dadasaheb Patil age 12, Basari and Kongo. 5) Atul Madhukar Kodgule, age 11, Violin and Accordian. 6) Subhash Dhondiram More, age 11, Tabala 7) Vilas Pandurang Damugade, age 11, Basari, 8) Milind Jayawantrao Patil, age 11,Tabala, Tabala Tarang and Bongo. 9) Sharad Rajaram Mahajan, age 11, Basari. 10) Arun Haripant Kulkarni, age 10, Hawai Guitar. 11) Ravindra Gajanan Lomate, age 9, Harmonium, 12) Anand Baburao Ghatage, age 9, Tabala. 13) Prashant Dadasaheb Patil, age 8, Harmonium. 14) Pradip Gajanan Lomate, age 11, Sello 15) Miss Anuradha Kishor Kulkarni, age 13, Violin. 16) Shubhangi Ramchandra Shinde, age 13, Santoor. 17) Dipa Pandurang Gune, age 12, Jaltarang. 18) Vidya Haribhau Kulkarni, age 13, Sitar. 19) Vandana Raghunath Patil, age 12, Base Guitar and Mandolin. 20) Arundhati Kishor Kulkarni, age 12, Sitar. 21) Vimal Ganapatrao Patil, age 12, Spannish Guitar and Sarod. 22) Aruna Gajanan Chikhalkar, age 11, Sarod and Mandolin. 23) Mugdha Nandkumar Naik, age 10, Gidnam Guitar 24) Padma Mahadeo Galande, age 10, Sarangi. 25) Yashaswini Shamrao Potnis, age 11, Jal Tarang. 26) Arundhati Madhukar Kodgule, age 10, Tar Shahanai. 27) Vinaya Virupaksh Tambade, age 9, Dilruba. 28) Anjali Nishikant Paramane, age 9, Israj. 29) Sangita Suresh Prabhu, age 10, Violin. 30) Anjali Bindumadhav Joshi, age 10, Harmonium and Electric Organ. 31) Madhuri Prataprao More, age 9, Dilruba, 32) Nilambari Jayawantrao Patil, age 8, Mandolin, 33) Vaijayanti Nishikant Paramane, age 9, Mandolin. 34) Tejaswini Shamrao Potnis, age 8, Violin and Harmonium. 35) Rajashri Ramchandra Patil age 9, Violin. 36) Anupama Dhanpal Chougule, age 7, Harmonium. 37) Sweta Nandkumar Naik, age 7, Violin and Santoor. 38) Asmita Vilasrao Kore, age 6, Violin. 39) Mitra Mukund Karambelkar, age 7, Mendolin. 40) Vidya Virupaksha Tambade, age 7, Dilruba, 41) Master Chinmay Shrikant Bhagwat age 8, Electric Guitar. 42) Kiran Mukund Karambelkar, age 9, Violin. 43) Abhay Bindumadhav Joshi, age 10 Violin. 44) Ramesh Bhanudas Rannavare, age 9, Tabala.

■ MUSIC DIRECTOR : **SHRI SHANKARRAO KULKARNI**

## Orchestra in action:



## Bhajan presented in Warakari attire:

